CNR No. MHRG120000292020

नियमीत दिवाणी दावा क्र. ४/२०२०
दत्तात्रय वि. नारायण

## <u>निशाणी क्र.१९ कडील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीने त्याचे विरुध्द दिनांक ०४/१०/२०२१ रोजी झालेला एकतर्फा आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्याची परवानगी मिळवण्यासाठी दाखल केला आहे. अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, कोविड-१९ च्या महामारीमुळे न्यायालयीन कामकाज बंद असल्याने व प्रवासावर शासनाचे निर्बंध असल्याने आणि महत्वाची कागदपत्रे व माहिती उपलब्ध न झाल्याने प्रतिवादीस मुदतीत हजर होवून कैफियत दाखल करता आली नाही. त्यामुळे त्यांनी प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्याची मागणी केली आहे. वादींनी आपले म्हणणे दाखल करुन अर्जातील कारण संयुक्तीक नमूद नाही. तसेच दावा युक्तीवादासाठी नेमण्यात आला आहे. त्यामुळे वादीने प्रस्तूतचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी मागणी केली आहे. प्रतिवादी तर्फे विद्वान विधीज्ञ श्री. ए. व्ही. देशपांडे आणि वादी तर्फे विद्वान विधीज्ञ श्री. एम. जे. तांबडकर यांचा युक्तीवाद केला.

२. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दिनांक २३/०३/२०२० रोजी दाव्याच्या सुनावणीकामी हजर राहण्याकरीता प्रतिवादीस समन्स जारी करण्यात आले होते. परंतू, कोविड-१९ च्या महामारीमुळे न्यायालयीन कामकाज बंद असल्यामुळे प्रतिवादी यांना मुदतीत हजर होवून कैफियत दाखल करता आली नाही. अर्जात नमूद करण्यात आलेल्या कारणांचा विचार केला असता दाव्याचा निकाल गुण-अवगुणावर लागण्यासाठी प्रतिवादीस दाव्यामध्ये हजर होवून आपली कैफियत दाखल करण्याची संधी मिळणे आवश्यक आहे या मतास मी पोहचलो आहे. याशिवाय प्रस्तूतचा

अर्ज मंजूर केल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे मी खालील आदेश पारित करतो -

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी याच्या विरुध्द निशाणी क्र. १ कडे पारीत झालेला एकतर्फा आदेश रद्द करून प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

(खुल्या न्यायालयात जाहिर)

(सं. गं. सरोदे)

दिनांक : ०३/०३/२०२२ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मुरूड